# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२१६५९४ E-Mail : college.section@unigug.ac.in

गो.वि./म.वि.वि.वि /683/२०२३ दिनांकः 19/05/२०२३

## परिपत्रक

विषय:— घडयाळी तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्तीकरिता कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.

संदर्भ:—१) शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण—२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशि—१ दि. १७ ऑक्टोबर २०२२ नुसार.
२) गो.वि./म.वि.वि.वि./२३८/२०२३ दिनांक १५/०२/२०२३

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. २ नुसार घडयाळी तासिका तत्वावर शिक्षकांचे नियुक्तीचे प्रस्ताव दि. ३० एप्रिल २०२३ पर्यत विद्यापीठात सादर करण्याकरिता कळविण्यात आलेले होते.

तथापी बऱ्याच महाविद्यालयाकडुन आजतागायत घडयाळी तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्तीचे प्रस्ताव विद्यापीठाकडे प्राप्त झालेले नाहीत. संदर्भीय शासन निर्णयामध्ये नमुद कालबध्द कार्यक्रमानुसार प्रस्ताव विद्यापीठात प्राप्त न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था/महाविद्यालयाचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांची राहील. करीता नोंद घ्यावी.

सहपत्र :— १) संदर्भीय शासन निर्णय
२) **CHB** शिक्षक मान्यतेकरिता प्रस्तावासोबत जोडावयाच्या दस्ताऐवजाची यादी.

मा. प्र—कुलगुरु यांच्या मान्यतेने

19/5/23

(देवेंद्र एम. झाडे)
उपकुलसचिव(प्र)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव सादर:—
१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२. मा. प्र—कुलगुरू महोदय, यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:— सी.एच.बी. शिक्षक मान्यताकरिता आवश्यक दस्ताऐवज

संस्थेचे नांव:——————————————————————

महाविद्यालयाचे नांव:————————————————————

| अ. क्र | सोबत लागणारे दस्तावेज | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | संस्था/ प्राचार्याच्या लेटरहेड वर प्रस्ताव सादर करावा. | |
| २ | संस्थेचा दिलेला नियुक्ती आदेश | |
| ३ | उमेदवाराचे रूजू पत्र सादर करावे. | |
| ४ | कार्यभार तक्त्यात (अनेक्झर —सी) माहिती सादर करावी. | |
| ४ | उमेदवाराचे पदवी पासुन ते पदव्युत्तर पर्यंत शैक्षणिक कागदपत्रे सादर करावे | |
| ५ | शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (Transfer Certificate ) सादर करावे. | |
| ६ | जातीचे प्रमाणपत्र सादर करावे. | |
| ७ | मा. सहसंचालक, नागपुर यांचे पद मान्यता पत्र झेराक्स प्रत सादर करावी. ( अनुदानित महाविद्यालयाकरिता ) | |
| ८ | कार्यभार विवरण तक्ता प्रपत्र अ व ब मध्ये सादर करावे. | |
| ९ | संस्थेने नियमानुसार वृतपत्रात शैक्षणिक अर्हतेच्या तपशिलासह प्रसिध्द केलेली मुळ जाहिरातीची प्रत सादर करणे अनिवार्य आहे. | |
| १० | चालु सत्राचे सलंग्निकरण आणि नादेय प्रमाणपत्र सादर करावे | |
| ११ | महाविद्यालयाचे वेळापत्रक | |
| १२ | निवड समितीचा अहवाल व उमेदवारांचे उपस्थिती पत्रक, | |
| १३ | संलग्नित केलेले प्रपत्र (अ) व (ब) ची माहिती सादर करावी. | |
| १४ | अनुदानित महाविद्यालयांनी CHB म्हणुन नियुक्त केलेल्या उमेदवारांचे रु. १००/— च्या स्टॅम्प पेपरवर घेतलेल्या हमीपत्राची साक्षांकित प्रत सादर करावी. | |
| १५ | नियमित शिक्षकांची पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेली असल्यास विद्यापीठ मान्यतेची साक्षांकित प्रत सादर करावी. | |
| १६ | महाविद्यालयाने नियुक्त केलेल्या घडयाळी तासिका तत्वावरील अध्यापक एकाच महाविद्यालयामध्ये कार्यरत असल्याबाबतचे संस्थेचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांचे हमीपत्र | |
| १७ | उपरोक्त सर्व प्रपत्रे व दस्ताऐवज प्राचार्य/अध्यक्ष/सचिव यांच्या स्वाक्षरीने साक्षांकित केलेले असणे आवश्यक राहील. | |
| १८ | इतर संबंधित प्रपत्रे आवश्यकतेनुसार | |

प्राचार्य/अध्यक्ष/सचिव